नि.दि.मु.क्र. ७९/२०१९ मधील नि. ५ खालील आदेश

(किसन सणस वि. मारुति जाधव)
CNR – MHST16-000483-2019

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादींविरुध्द तुर्तातुर्त ताकीद देणेकामी दाखल केला आहे.

वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे असे आहे की,

२. मौजे वेलंग, तालुका वाई जिल्हा सातारा येथील दावा कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत ज्याचा जुना ग्रामपंचायत मिळकत नं. २२४ व नविन ग्रामपंचायत मिळकत नं. २६८ यामधील ३५X३३ पूर्वाभिमुखी विट सिमेंट प्लॅस्टरचे घर, वर पत्रा, शौचालय, १२X१० किराणा दुकान पू.प.द.उ. सदर घर मिळकतीचे समोरील भवानी मातेचे मंदिर असे संपूर्ण क्षेत्र ५ आर (येथून पुढे ‘वाद मिळकत’ संबोधण्यात येते.) या मिळकतीमध्ये वादी यांची सुमारे ४१ वर्षांपासूनची कायदेशीर कब्हेवहिवाट आहे. सदर मिळकतीचे सर्व शासकीय कर वादीने नियमितपणे अदा केले आहेत तसेच वादीने सदर मिळकतीत विद्युत पुरवठा घेतला आहे. या मिळकतीचा वापर वादी किराणा मालाचे दुकानाकरिता व रहाण्याकरिता करतो. वादीने सदर मिळकतीत रस्त्यालगतचे काही क्षेत्र वगळता इतर सर्व बाजूस हद्दीबरोबर संरक्षण भिंतीचे काम केले आहे. वादीच्या मिळकतीतील जागेत दक्षिण पश्चिम कोप—यात शौचालयाचे बांधकाम आहे तसेच दक्षिणेकडील जागेत भवानी मातेचे मंदिर बांधले आहे. वादी सदर मिळकतीचा उपभोग त्याचे कुटुंबासह कायदेशिर हक्काने घेत आहे.

३. वादीचे कथन पुढे असे आहे की, वादीची पूर्वीची जागा त्याला धरणग्रस्त म्हणून सोडावी लागल्याने त्याला दुकानासाठी व रहाण्यासाठी जागा नव्हती. त्यावेळी वादीची अडचण जाणून प्रतिवादींचे वडिल काळू पांडू जाधव यांनी त्यांचे कब्जेवहिवाटीपैकी रस्त्यालगत पश्चिमेकडील ५ आर मिळकत वादीला देण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे दोघांनी लेखी लिहून प्रतिवादीचे वडिलांनी त्याचा मोबदला र.रु. ९००/— स्विकारुन सदर ५ आर मिळकत वादीचे प्रत्यक्ष ताबे वहिवाटीस दिली. त्यास साक्षीदार म्हणून वेलंग गावचे सरपंच सदाशिव धोंडी हगवणे व आनंदराव पुंडलिक सुर्यवंशी होते. प्रतिवादींचे वडिलांनी वादीस सदर जागेत बांधकाम करुन त्याचा वापर रहिवास व दुकान याकरिता करण्याची परवानगी दिली व त्याप्रमाणे वादी सदर मिळकतीत बांधकाम करुन तेथे टेलरिंगचा व्यवसाय करु लागले. वादी सदर मिळकतीचा उपभोग कायदेशिर मार्गाने घेत असल्याने प्रतिवादींचे वडिलांनी वादीचे कब्जेवहिवाटी बाबत कधीही हरकत केली नाही.

४. वादीचे कथन पुढे असे आहे की, वादीचे वाद मिळकतीतील जुने घर पावसाने कोसळल्यामुळे वादीने सदर ठिकाणी सुमारे २५ लाख रुपये खर्च करुन नविन इमारतीचे बांधकाम केले व त्यास प्रतिवादींची संमती होती. तसेच सदर मिळकतीचे हद्दीबरोबर सुमारे ५ फुट उंचीचे संरक्षक भिंतीचे काम केले. या सर्व बाबी प्रतिवादींचे समक्ष वादीने केल्या होत्या. अशी परिस्थिती असताना प्रतिवादींनी वादीचे प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीस असलेल्या मिळकतीचे क्षेत्रावरुन वाद उपस्थित करुन सदर मिळकतीत अनाधिकाराने कब्जा करण्याचा प्रयत्न सुरु केला. त्याबाबत वादीने वेलंग गावचे तंटामुक्ती समितीकडे सदर तक्रार उपस्थित केली. त्यावेळी तंटामुक्ती समितीने वादीकडे प्रतिवादींचे वडिलांनी लिहून

दिलेल्या लेखाची मागणी केली. परंतु, सदर लेख हा वादीने त्याचा मयत मुलगा राजेंद्र किसन सणस याचेकडे आर्थिक सहाय्य घेणेकरिता दिला असल्याचे व तो मयत असल्याने त्याने मूळ दस्त कोणत्या वित्तीय संस्थेकडे अथवा बॅकेकडे दिला याची वादीला माहिती नसल्याचे सांगितले.

५. वादीचे कथन पुढे असे आहे की, वादी व प्रतिवादींचे वडिलांमध्ये झालेल्या व्यवहारामधील साक्षीदार सदाशिव धोंडी हगवणे हे प्रतिवादींचे नातेसंबंधातील असल्याने त्यांनी जाणीवपूर्वक तंटामुक्ती समितीकडे साक्ष देण्याचे टाळले तसेच तंटामुक्तीचे अध्यक्ष व प्रतिवादी नं.१ चा मुलगा यांचे मैत्रीचे संबंध असल्याने वादीला तंटामुक्ती समितीकडून कोणताही न्याय मिळाला नाही. वरील सर्व परिस्थितीचा गैरफायदा प्रतिवादी यांनी घेण्याचे ठरवून वाद मिळकतीत बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करुन कब्जा करण्याचा प्रयत्न केल्याने वादीने सदरचा दावा हा निरंतर ताकिदीकरिता दाखल केला आहे व दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत प्रतिवादींनी वादीचे शांततामय व कायदेशिर कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा होईल असे कोणतेही कृत्य अथवा गैरहक्की मार्गाने घुसखोरी करुन अनाधिकाराने वाद मिळकतीत कब्जा करण्याचा प्रयत्न करु नये म्हणून त्यांना तुर्तातूर्त ताकिद देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

६. सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादींनी नि. १४ वर म्हणणे दाखल करुन अर्जातील सर्व नमूद कथने नाकारली आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी हे मौजे वेलंग, ता. वाई, जि. सातारा येथिल रहिवासी असून त्याठिकाणी स.नं. १६४/१

क्षेत्र २ हे ३५ आर ही मिळकत प्रतिवादींचे मालकी हक्क व खुद्‌द वहिवाटीची आहे. सदर मिळकतीत असणारे ३३X३५ पूर्वमुखी विट सिमेंट प्लॅस्टरचे जुने रहाते घर प्रतिवादींचे पूर्व हक्कदारांनी वादीला विना मोबदला प्रेमापोटी लायसन्सी हक्काने रहाण्यास दिले. या व्यतिरिक्त वादीचा सदर संपूर्ण मिळकतीशी कसलाही संबंध नाही. दि. १७/०६/२०१९ रोजी प्रतिवादींनी वादीला नोटीस पाठवून सदर मिळकतीतील वादीचा लायसन्सी हक्क संपुष्टात आणला आहे व दि. ०१/०८/२०१९ रोजी अथवा तत्पूर्वी सदर मिळकतीचा एकजिनसी कब्जा प्रतिवादींना मागितला त्यामुळे वादीने खोटा व बनावट स्वरुपाचा दावा दाखल केला आहे.

७. प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, रि.स.नं. १६४/१ या मिळकतीतील ३३X३५ म्हणजेच ११५५ चौ. फुट एवढीच जागा प्रतिवादींचे पूर्व हक्कदारांनी वादीला रहाण्यासाठी विनामोबदला लायसन्सी हक्काने दिली होती. या व्यतिरिक्त वादीला सदर मिळकतीत कसलाही हक्क नव्हता. सदर मिळकतीचा नोंदणीकृत दस्त प्रतिवादींचे पूर्व हक्कादार अथवा प्रतिवादींनी वादीला करुन दिलेला नाही. ३३X३५ एवढयाच जागेची नोंद ग्रामपंचायत रेकॉर्डला झाली असून व या व्यतिरिक्त वादीने दावा कलम १ मध्ये वर्णन केलेली जागा ही प्रतिवादींचे रि.स.न. १६४/१ चा भाग असून सदर मिळकतीशी वादीचा काहीही संबंध नाही.

८. प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, वादीने दावा कलम १ मध्ये वर्णन केलेले भवानी मातेचे मंदीराची प्राणप्रतिष्ठा प्रतिवादींनी केली आहे. त्या मिळकतीत जाण्या येण्यासाठी प्रतिवादींनी रस्ता ठेवला आहे

व सदर मिळकत खुली जागा असल्याने तेथे संरक्षक भिंत बांधली आहे. सदर मिळकत वादीचे मालकी हक्काची नाही. रि.स.नं. १६४/१ या मिळकतीचे प्रतिवादी हे मूळ मालक असल्याने मूळ मालकाविरुध्द वादीला कसलाही मनाई हुकूम मागता येणार नाही. प्रतिवादींविरुध्द ताकीद मिळाल्यास उर्वरित ४००० चौ. फुटाचा कब्जा घ्यायचा वादीचा दुष्ट हेतू दिसून येतो. अशा परिस्थितीत वादीचे लाभार्थ मनाई हुकूम झाल्यास प्रतिवादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. केवळ प्रतिवादींना त्रास देण्याच्या उद्देशाने सदरचा अर्ज दाखल केला असल्याने तो नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

९. वादी व प्रतिवादींच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला तसेच अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

१०. खालील मुद्‌दे विचारार्थ उद्‌भवत असुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे आहेत.

क्र.	**मुद्‌दे**	**निष्कर्ष**
१	वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी प्रकरण आहे काय?	होय
२	वादीच्या बाजुने सोईचा समतोल आहे काय ?	होय
३	वादीच्या बाजुने तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होईल काय ?	होय
४	काय आदेश ?	अर्ज अंशत: मंजुर करण्यात येत आहे.

:: का र ण मि मां सा ::

मुद्‌दा क्र. १ ते ३ :—

११. मुद्‌दे क्र. १ ते ३ सोयीच्या दृष्टीने एकत्रित चर्चेला घेतले आहेत.

१२. वादी व प्रतिवादी यांची कथने विचारात घेता असे दिसुन येते की, प्रतिवादींनी हे मान्य केले आहे की, स.नं. १६४/१ क्षेत्र २ हे. ३५ आर या मिळकतीमधील ३३X३५ पूर्वमुखी विट सिमेंट प्लॅस्टरचे घर, वर पत्रा हे त्यांचे पूर्व हक्कदारांनी वादीला विनामोबदला लायसन्सी हक्काने रहाण्यास दिले होते. परंतु, वादीचे असे म्हणणे आहे की, ग्रामपंचायत मिळकत न. २६८ (जुना मिळकत क्र. २२४) या मिळकतीमधील ३५X३३ पूर्वमुखी विट सिमेंट प्लॅस्टरचे घर, वर पत्रा, शौचालय, १२X१० किराणा दुकान तसेच सदर घर मिळकतीच्या समोरील भवानी मातेचे मंदिर अशी संपूर्ण ५ आर क्षेत्रफळाची मिळकत ही प्रतिवादींचे पूर्व हक्कदारांनी वादीचे प्रत्यक्ष ताबेवहिवाटीत दिली असून त्यावर वादीची ४१ वर्षापासून कब्जेवहिवाट आहे.

१३. वादीच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला आहे की, ''वाद मिळकत ही वादीचे कब्जात असल्याची बाब प्रतिवादींनी मान्य केली आहे. तसेच वादीने जुने बांधकाम पाडून त्या ठिकाणी नविन बांधकाम तसेच कंपाउंड केले आहे. अशा प्रकारे संपूर्ण ५ आर क्षेत्र हे वादीच्या कब्जात आहे. तसेच रि.स.नं. १६४/१ हा प्रतिवादींचे मालकीचा असल्याबाबत कोणताही पुरावा नसून वादीच्या ताब्यात असलेल्या खुल्या

जागेत प्रतिवादींचा कोणताही संबंध नसताना ते वादीचे कब्जेवहिवाटीला हरकत अडथळा करत असून त्यांनी वादीला नोटीस देवून कब्जाची मागणी केली आहे''. याउलट प्रतिवादींचे वकिलांनी असा युक्तिवाद केला आहे की, ''प्रतिवादींचे पूर्व हक्कदारांनी वादीला केवळ ३३X३५ पूर्वमुखी सिमेंट प्लॅस्टरचे घर रहाण्यासाठी दिले होते व उर्वरित जागेशी वादीचा कोणताही संबंध नसून संपूर्ण मिळकत ही वादीच्या मालकीची नाही. तसेच वाद मिळकत ही रि.स.नं. १६४/१ चा भाग असून सदर मिळकत ही प्रतिवादींच्या मालकीची आहे. वादींना केवळ रहाण्यासाठी घर दिलेले असून उर्वरित क्षेत्र हे वादीच्या मालकीचे नसतानाही वादी त्या क्षेत्राबाबत मनाई हुकूम मागत आहेत. तसेच प्रतिवादी हे संपूर्ण मिळकतीचे मालक असल्याने वादीला जागेच्या मूळ मालकाविरुध्द कायद्याने ताकीद मागता येणार नाही. तसेच वादीने दाखल केलेला केवळ मनाई हुकूमाचा दावा कायद्याने चालण्यास पात्र नाही''.

१४. प्रतिवादींतर्फे त्यांचे युक्तिवादाचे पुष्टयर्थ न्यायनिर्णय दाखल करण्यात आले आहेत. सदर न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता त्यावरुन हे स्पष्ट होते की, ज्यावेळी एखाद्या व्यक्तीने मालकी हक्क नाकारला असेल तर त्याला मालकी हक्काचा ठराव मागितल्याशिवाय केवळ मनाई हुकूमाचा दावा दाखल करता येणार नाही. सदर बाब वेळोवेळी मा. सर्वोच्च न्यायालय तसेच मा. उच्च न्यायालय यांनी न्यायनिर्णयाद्वारे स्पष्ट केलेली आहे.

१५. वादीचे कथनांवरुन वादीने प्रतिवादींची मालकी नाकारलेली नसल्याचे स्पष्ट होते. अशा परिस्थितीत उपरोक्त न्यायनिर्णयाचा आधार सदर प्रकरणात घेता येणार नाही. प्रतिवादींना हे मान्य आहे की, वादी

३३X३५ पूर्वमुखी सिमेंट प्लॅस्टरचे घर वर पत्रा असे एकूण क्षेत्र ११५५ चौ. फुट मध्ये रहात असून तेवढीच जागा त्यांचे पूर्व हक्कदारांनी वादीला रहाण्यासाठी दिली होती. सबब वाद मिळकतीपैकी घर मिळकतीमध्ये वादीचा कब्जा आहे हे प्रतिवादींना मान्य आहे. केवळ वाद असा आहे की, सदर घराच्या बाहेर असलेले भवानी मातेचे मदिर व उर्वरित मोकळी जागा व त्याभोवती केलेली संरक्षक भिंत असे उर्वरित क्षेत्र हे वादीच्या मालकीचे नसून त्यामध्ये वादीची कब्जे वहिवाट नाही. त्यावर वादीचे असे म्हणणे आहे की, पूर्वीपासून ३३X३५ पूर्वमुखी सिमेंट प्लॅस्टरचे घर वर पत्रा तसेच घराच्या बाजूची संरक्षक भिंत व त्यामधील क्षेत्र असे एकूण ५ आर क्षेत्र त्याच्या ताब्यात असून सदर मोकळया जागेत प्रतिवादी त्याचे वहिवाटीला अडथळा करीत आहेत. सबब, वादीच्या म्हणण्यानुसार त्याच्या ताब्यात एकूण ५ आर क्षेत्र आहे. याउलट प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार वादीला केवळ ३३X३५ म्हणजेच ११५५ चौ. फुट एवढीच जागा रहाण्यासाठी दिलेली असून उर्वरित क्षेत्राशी वादीचा संबंध नाही व कब्जाही नाही.

१६. उभय पक्षांनी अभिलेखावर ग्रामपंचायत मिळकत नं. २६८ म्हणजेच वाद मिळकतीचे नमुना ८ चे उतारे दाखल केलेले असून त्यावरुन ३३X३५ पूर्वमुखी विट सिमेंट प्लॅस्टरचे घर, वर पत्रा, शौचालय पैकी १२X१० किराणा दुकान असे मालमत्तेचे वर्णन असून त्याचे क्षेत्रफळ १०३५ व १२० म्हणजेच एकूण ११५५ चौ. फुट एवढेच नमूद केलेले आहे. सबब त्यावरुन वादीचे कब्जात घर व किराणा दुकान असे मिळून एकूण ११५५ चौ. फुट एवढेच क्षेत्र कब्जात असल्याचे स्पष्ट होते.

१७. वादीतर्फे सदर मिळकतीचा पूर्वीचा मिळकत नं. २२४ चा नमुना ८ चा उतारा दाखल केला असून त्यावरुन मिळकतीचे वर्णन पूर्वाभिमुखी ५ खण, पुढे मागे पडवी, एकूण १५ खण पू.प.द.उ. खुली जागा असे एकूण क्षेत्र ३००० चौ. फुट असल्याचे दिसून येते. सदर नमुना ८ अ चे उता—यावरुन मिळकत नं. २६८ हि वादीचे कब्जात असल्याचे स्पष्ट होत असले तरी त्यावरुन तो त्या मिळकतीचा मालक आहे असे सिध्द होत नाही. तसेच वादीच्या म्हणण्यानुसार तो प्रतिवादींच्या पूर्वजांच्या परवानगीने वाद मिळकतीत रहात आहे. म्हणजेच त्याला प्रतिवादी हे मालक असल्याचे मान्य आहे हे स्पष्ट होते. सबब दाखल नमुना ८ चे उता—यावरुन वादीचे कब्जे वहिवाटीत एकूण ५ आर क्षेत्र आहे असे कोठेही स्पष्ट होत नाही. याउलट त्यावरुन केवळ बांधलेले घर व किराणा दुकान असे सद्यस्थितीत एकूण ११५५ चौ.फुट क्षेत्र ही मिळकत वादीचे कब्जेवहिवाटीस असल्याचे स्पष्ट होते व सदर बाब प्रतिवादींचे कथनांना पुष्टी देते.

१८. वादीने साक्षीदार एकनाथ कोंडीबा सणस व आनंदा बैजू सणस या साक्षीदारांचे शपथपत्र दाखल केले असून शपथपत्रांचे अवलोकनावरुन असे दिसून येते की, सदर दोन्ही साक्षीदारांनी वादीचे घ राचे बांधकाम केल्याचे कथन केले आहे. तसेच वादीने बांधकामासाठी लागणारे साहित्य खरेदी केल्याच्या पावत्या व ग्रामपंचायतीची पाणी वापराची फी भरल्याची पावती अभिलेखावर सादर केली आहे. त्यावरुन वादीने घराचे बांधकाम केले असे दिसून येत असले तरी त्यावरुन वाद मिळकतीचे संपूर्ण क्षेत्र हे वादीच्या कब्जे वहिवाटीत आहे हे सिध्द होत नाही.

१९. वादीने सदर दावा मिळकत ही प्रतिवादींचे पूर्व हक्कदारांनी त्याला रहाण्यासाठी व वापरण्यासाठी दिल्याचे कथन केले असल्याने प्रतिवादी हे सदर मिळकतीचे मूळ मालक आहेत ही बाब वादीला मान्य आहे हे स्पष्ट होते. प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, सदर दावा मिळकत ही स.नं. १६४/१ चा भाग असून सदर संपूर्ण मिळकत ही त्यांचे मालकी हक्क व वहिवाटीची आहे. त्याकरिता त्यांनी सि.स.नं. १६४/१ चे ७/१२ चे उतारे दाखल केले असून त्यावरुन सदर मिळकतीस भोगवटादार सदरी प्रतिवादींची नावे आहेत हे स्पष्ट होते. वादीने दावा मिळकत ही प्रतिवादींची मालकी हक्काची असल्याची बाब नाकारली नाही. सदर बाबीस दाखल ७/१२ चे उतारे पुष्टी देतात. सबब प्रतिवादी हे दावा मिळकतीचे मालक असल्याचे व वादी हे दावा मिळकतीत प्रतिवादींचे पूर्व हक्कदारांच्या परवानगीने रहात असल्याचे स्पष्ट होते.

२०. अभिलेखावर दाखल असलेले दावा मिळकतीचे नमुना ८ चे उता—यावरुन वादीचे कब्जात केवळ घर व किराणा दुकान असे एकूण ११५५ चौ. फुट क्षेत्र असल्याचे स्पष्ट होत असून त्यामध्ये असलेली कब्जे वहिवाट ही वादीला प्रतिवादींचे पूर्व हक्कदाराचे परवानगीने मिळालेली आहे. तसेच वर नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी हे सदर संपूर्ण मिळकतीचे मूळ मालक असून त्यांनी दावा मिळकतीतील केवळ ११५५ चौ. फुट क्षेत्र वादीला रहाण्यासाठी दिलेले असल्याने उर्वरित क्षेत्राशी वादीचा कोणताही संबंध नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. प्रतिवादी हे उर्वरित क्षेत्राचे मालक असल्याने मूळ मालकांविरुध्द वादीला मनाई हुकूम मागता येणार नाही. परंतु, प्रतिवादी यांनी वादीकडून त्याला रहाण्यास दिलेल्या क्षेत्राचा कब्जा मागितलेला आहे व तशी नोटीस वादीला दिलेली

आहे. जरी प्रतिवादींनी वादीला कब्जा दिला असला तरी सदरचा कब्जा हा त्यांना कायदेशिर मार्गाचा अवलंब करुन मागणे आवश्यक आहे. त्याकरिता त्यांना वादीला त्याचे रहाते घरातून हुसकावून लावता येणार नाही व अनाधिकाराने घराचा कब्जा घेता येणार नाही.

२१. वर चर्चिल्याप्रमाणे प्रतिवादी हे संपूर्ण क्षेत्राचे मालक असल्याने वादीला त्यांच्याविरुध्द मनाई हुकूम मागता येणार नाही. परंतु, वादीस प्रतिवादींचे पूर्व हक्कदारांनी रहाण्यासाठी दिलेली जागा व त्यातील कब्जा प्रतिवादींना कायदेशिर मार्गाचा अवलंब केल्याशिवाय घेता येणार नाही. प्रतिवादींनी वादीकडे दावा मिळकतीच्या कब्जाची मागणी केलेली आहे. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी हे वाद मिळकतीत घुसखोरी करुन अनाधिकाराने वाद मिळकतीचा कब्जा करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याबाबत वादीने प्रतिवादींविरुध्द दाखल केलेल्या अदखलपात्र गुन्हयाची प्रत अभिलेखावर सादर केली आहे. सबब वाद मिळकतीपैकी ३३X३५ पूर्वमुखी विट सिमेंट प्लॅस्टरचे घर, वर पत्रा, शौचालय पैकी १२X१० किराणा दुकान असे एकूण क्षेत्र ११५५ चौ. फुट यामध्ये वादीचा कब्जा आहे हे प्रथमदर्शनी दिसून येते व सदर कब्जाची मागणी प्रतिवादींनी केली आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादींना वादीला त्याचे रहाते घरातून म्हणजेच एकूण क्षेत्र ११५५ चौ. फुट यातून बेकायदेशिरपणे हुसकावून लावण्यापासून परावृत्त करणे गरजेचे आहे. सबब वादीचे बाजूने प्रथमदर्शनी प्रकरण असल्याचे स्पष्ट होते.

२२. सद्य स्थितीत मनाई हुकूम दिला नाही तर प्रतिवादी वादीचे कब्जातील एकूण ११५५ चौ. फुट क्षेत्राचा कब्जा घेण्याची शक्यता नाकारता येत नाही व त्यामुळे वादीचे कुटुंब रस्त्यावर येवून वादीचे

नुकसान होणार आहे. याउलट मनाई हुकूम दिला तर प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे सोईचा समतोल हा वादीचे बाजूने आहे. वादीने वाद मिळकतीतील संपूर्ण क्षेत्रात त्याचा कब्जा आहे हे सिध्द केलेले नाही. वाद मिळकतीपैकी केवळ क्षेत्र ११५५ चौ. फुट या क्षेत्रामध्ये वादीची कब्जेवहिवाट असल्याचे दिसून येत असल्याने व उर्वरित क्षेत्रावर वादीचा कब्जा आहे हे वादीने सिध्द केलेले नसल्याने केवळ वादीच्या कब्जात असलेले क्षेत्र ११५५ चौ. फुट या क्षेत्रापुरता मनाई हुकूम देणे योग्य होईल. म्हणुन मी मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवत असुन मुद्दा क्र. ४ चे निष्कर्षार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

:: आ दे श ::

१. अर्ज अंशत: मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत, प्रतिवादींनी वाद मिळकतीपैकी ''३३X३५ पूर्वमुखी विट सिमेंट प्लॅस्टरचे घर, वर पत्रा, शौचालय पैकी १२X१० किराणा दुकान असे एकूण क्षेत्र ११५५ चौ. फुट'' या क्षेत्रातील वादीचे कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये तसेच सदर क्षेत्रात गैरहक्काने घुसखोरी करुन अनाधिकाराने वादीचा कब्जा घेण्याचा प्रयत्न करु नये अशी त्यांना तुर्तातूर्त ताकिद देण्यात येत आहे.

ठिकाण : वाई. (एस. आर. भोर)
दिनांक : ०९/०७/२०१९. सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, वाई.